CMYK

गावकरी आंदोलनात सहभागी होणार, सरकारकडून कोणतीही चर्चा नाही : देशमुख

>> पान 2

इतर पक्ष गोऱ्हे यांच्यावर का नाही बोलत : सुषमा अंधारे

>> पान 3

केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली दुबईतील अबुधाबी येथे २३ फेब्रुवारीला साजरा झाला शिवजयंती उत्सव

>> पान 4

**सुविचार**

स्वतंत्रतेची निष्ठा असलेले माणूस सर्वदा सामर्थ्याच्या उंचावर असतो.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



विकी कौशल स्टारर 'छावा' चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर केला धमाका

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 195 ■ मंगळवार, दि. 25 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


# येत्या नवीन शैक्षणिक वर्षापासून स्कूल बसेससाठी नवी नियमावली



## परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खाजगी स्कूल बसेससाठी येत्या नवीन शैक्षणिक वर्षापासून नियमावली निश्र्चित करण्यात येणार आहे. त्यासाठी निवृत्त परिवहन अधिकारी जितेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमण्यात आली असून त्यांना पुढील एक महिन्यांमध्ये या संदर्भातला अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.



संपूर्ण राज्यांमध्ये शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या हजारो स्कूल बस खाजगी संस्थांच्या मार्फत चालवण्यात येतात. या स्कूलबसच्या माध्यमातून अनेक संस्थांचालक पालकांची आर्थिक लुबाडणूक करत असल्याच्या तक्रारी परिवहन विभागाला प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने आज (२४ फेब्रुवारी) परिवहन विभागामध्ये राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. त्यामध्ये येत्या शैक्षणिक वर्षापासून या स्कूल बसेस साठी नवी नियमावली निश्र्चित करण्यासाठी निवृत्त परिवहन अधिकारी जितेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमण्यात आली असून या समितीने आपला अहवाल पुढील एक महिन्यांमध्ये सादर करावयाचा आहे. तसेच या संदर्भात सन २०११ मध्ये विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या रिक्षाचालकांची मनमानी रोखण्यासाठी मदान समितीने ज्या उपायोजना सुचवल्या होत्या त्या देखील विचारात घेतल्या जाणार आहेत. या सर्वंकश अहवालाच्या अनुषंगाने नवीन शैक्षणिक वर्षापासून स्कूल बसेससाठी नियमावली निश्र्चित केली जाणार आहे.

राज्यभरात स्कूल बसेस ज्या संस्थाचालकांच्या माध्यमातून चालवल्या जातात, त्यासंदर्भात अनेक तक्रारी पालकांच्याकडून परिवहन विभागाला प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने शैक्षणिक वर्षाच्या एकूण कालावधी पैकी १० महिने या स्कूल बसेस विद्यार्थी

>> पान २

## पुण्यात पुन्हा कोयते रक्ताने माखले, मध्यरात्री 10 जणांनी घेतला बदला, तरुणावर सपासप वार

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** मागील काही दिवसांपासून पुण्यात कोयता गँगच्या दहशतीच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. पोलिसांनी वेळोवेळी कारवाई करत कोयता गँगला चाप बसवण्याचा प्रयत्न केला. मात्र कोयता हल्ल्याची घटना सुरूच आहेत. रविवारी मध्यरात्री पुन्हा एकदा कोयता हल्ल्याने पुणे हादरलं आहे. पुण्यातील कोथरुड परिसरात रविवारी मध्यरात्री दहा जणांच्या टोळक्याने एका तरुणावर कोयता आणि तलवारीने सपासप वार केले आहेत.

हा हल्ला इतका भयंकर होता की संबंधित तरुणाचा जागीच मृत्यू झाला. पुण्यातील प्राईम लोकेशन असलेल्या कोथरुड भागात खूनाची ही घटना घडल्याने शहरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी कोथरुड पोलीस ठाण्यात एकूण आठ जणांवर गुन्हा दाखल केला आहे. दिनेश भालेराव (वय २७), सोहेल सय्यद (वय २४), राकेश सावंत (वय २४), साहिल वाकडे (वय २५) बंड्या नागटिळक (वय १८), लखन शिरोळे (वय २७) अनिकेत उमाप अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत.

# शेतकऱ्यांना आता वर्षाला १५ हजार मिळणार

दैनिक आपला विदर्भ

## मुख्यमंत्र्यांची घोषणा, 'पीएम किसान'चे पैसे खात्यात!

**नागपूर/प्रतिनिधी :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जेव्हा किसान सन्मान योजना सुरू केली तेव्हा त्यावर विरोधकांकडून टीका झाली. पण आज शेतकऱ्यांच्या अडचणीत तो पैसे कामात येत आहे. या योजनेचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होत आहे. परिणामी, राज्य सरकार देखील आपले पैसे यात देत असून त्यात वाढ देखील केली जाईल. त्यामुळे वर्षाला १५ हजार रुपये हे शेतकऱ्यांना मिळणार असल्याची मोठी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा १९वा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते (ऑनलाइन) वितरण होत आहे. नागपूरच्या वनामती सभागृहात हा कार्यक्रम पार पडत असून या ठिकाणी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी बोलताना ही घोषणा केली आहे.



मी मुख्यमंत्री असताना कृषी क्षेत्रात अनेक काम केलेत. त्यात जलयुक्त शिवार, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना आणली. आता त्याचा दुसरा टप्पा सुरू होतोय, पूर्ण विदर्भ, मराठवाडा यात समाविष्ट होईल. यासाठी ६ हजार कोटी रुपये खर्च होणार आहेत. तर दुसरीकडे कृषी प्रक्रिया उद्योग, कॅश क्रॉपसाठी मदत केली जाणार आहे. किंबहुना चांगलं काम करणाऱ्यांचा हप्ता थांबवू नका अशी सूचना अधिकाऱ्यांना दिल्याचेही देवेंद्र फडणवीस म्हणाले. ॲग्रीस्टॉकमुळे दलाल विरहित शेतीपर्यंत पोहोचण्याचा साधन होत आहे. आतापर्यंत ५४ टक्के शेतकरी यात शामिल झाले असून पुढील काळात १०० टक्के शेतकरी यात आणायचे आहे. असेही मुख्यमंत्री म्हणाले.


शेतकरी उत्पादन खर्च कमी करून शेतकऱ्यांना बाजाराशी जोडण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. गावातील सोसायटी डिजिटल केले जात आहे. त्यांना आणखी मजबूत केलं जातं आहे. शेतकऱ्यांचे वीज बिल माफ केलं असून पुढील पाच वर्ष वीज बिल येणार नाही. शिवाय कृषी सोलर पंप योजना जेव्हा सुरू झाली तेव्हा पासून मागल्या वर्षी पर्यंत २ लाख कनेक्शन, तर गेल्या १ वर्षात दोन लाख कनेक्शन दिले गेलेत. त्याचा पूर्ण देखरेख इन्शुरन्स आमच्याकडे आहे. वैनगंगा, नळगंगा हा नदी जोड प्रकल्प सुरू होत असून यातून ७ जिल्ह्यातील १० लाख एकर जमीन ओलिताखाली येणार आहे. केंद्र आणि राज्यसरकार शेतकरी समर्पित असल्याची भावना ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी यावेळी बोलून दाखवली.

## मुरलीधर मोहोळांच्या निकटवर्तीयाला मारहाण; गुंड गजा मारणेसह टोळीवर मकोका

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** भाजपा नेते आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या निकटवर्तीयाला मारहाण करणाऱ्या गजा मारणे टोळीच्या तीन आरोपींवर मकोका (श्ण्ध्अ) लावण्यात आला आहे, अशी माहिती पुणे पोलिसांनी दिली आहे. यासोबतच टोळीचा प्रमुख गजा मारणे याच्यावरही कठोर कारवाई केली जाणार असल्याचे पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट केले आहे.

कोथरूड परिसरात भरदिवसा एका तरुणाला मारहाण करण्यात आली होती. या प्रकरणात पोलिसांनी तातडीने कारवाई करत मारणे टोळीशी संबंधित तिन्ही आरोपींना अटक केली.



## अपघातानंतर मोटर पेटून दोघांचा जळून मृत्यू, मृतांमध्ये पोलीस कर्मचाऱ्यासह तरुणाचा समावेश

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** जामखेड शहरातील बीड रस्त्यावर चारचाकी मोटार रस्त्याच्या दुभाजकाला धडकल्यानंतर, मोटारीने पेट घेतला. या अपघातात जामखेड पोलिस ठाण्यातील कर्मचाऱ्यासह आणखी एका तरुणाचा जळुन मृत्यू झाला. हा अपघात आज, सोम वारी पहाटे घडला.

>> पान २

# उष्माघाताचा पहिला बळी सांगलीत

## गॅरेगारविक्रेत्याचा मृत्यू; कडक उन्हामुळे भोवळ येऊन उलट्या

**सांगली/प्रतिनिधी :** मार्च महिना मध्यावर आला की उन्हाळ्याची चाहुल लागते, होळी सणात थंडी जळून जाते अन् उन्हाळा सुरू होतो असे जुने-जाणते सांगत असतात. मात्र, अलिकडे तिन्ही ऋतूंमध्ये बदल झाल्याचं पाहायला मिळते. पावळ्यात पाऊस नक्षत्रानुसार पडतच नाही, तर थंडीच्या ४ महिन्यात थंडीचा तेवढासा प्रभाव दिसून येत नाही. आता, उन्हाळाही लवकरच सुरू झाल्याचं पाहायला मिळत आहे. फेब्रुवारी महिन्यातच सूर्य आग ओकताना दिसून येत असून सांगली जिल्ह्यात यंदाच्या उन्हाळ्यातील उष्माघाताच पहिला बळी झाल्याची घटना समोर आली आहे. सांगली शहरातील हिराबाग कॉर्नर येथे आईसक्रीम विक्रेत्या व्यक्तीला उष्माघाताने



भोवळ आली, त्यानंतर त्यांना रक्ताच्या उलट्या झाल्या आणि त्यांचा मृत्यू झाला. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात तापमानाने फ ेब्रुवारी महिन्यातच पस्तीशी ओलांडली असून सोलापूर व नागपूरमध्ये तापमान ३८ अंश सेल्सियसपर्यत पोहोचलं आहे.

सांगली जिल्ह्यात उन्हाळ्याची तीव्रता वाढली असून या रखरखत्या उन्हाचा त्रास झाल्याने उलट्या होऊन एका परप्रांतीय गॅरेगार विक्रेत्याचा मृत्यू झाल्याची घटना हिराबाग कॉर्नर येथे घडली आहे. हिराबाग कॉर्नर येथील वॉटर हाऊसजवळ रखरखत्या उन्हाचा त्रास होऊन आईस्क्रीम गोळे विकणाऱ्या एका व्यक्तीचा रक्ताच्या उलट्या होऊन मृत्यू झाला. रामपाल असे या व्यक्तीचे नाव असून रक्ताच्या उलट्या होऊन त्यांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेनंतर स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अधिक माहितीसाठी त्यांचा मृतदेह सांगलीतील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी नेण्यात आला आहे.

>> पान २

## दारू पिऊन आले, फुकट 'छावा' दाखवा म्हणून अरेरावी, जालन्यातील सिनेमागृहात धुडगूस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या सगळीकडे छावा या चित्रपटाची चर्चा चालू आहे. बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट चांगला गल्ला कमवताना दिसतोय. विशेष म्हणजे या चित्रपटाने ३०० कोटींपेक्षा जास्त कमाई केली आहे. महाराष्ट्रात तर या चित्रपटाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतोय. दरम्यान, याच चित्रपटासंदर्भात जालना जिल्ह्यात एक अजब प्रकार घडला आहे. छावा चित्रपट पाहायला आलेल्या मद्यधुंद लोकांनी सिनेमागृहात थेट तोडफोड केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार जालना शहरात एका सिनेमागृहात काही मद्यधुंत प्रेक्षक घुसले. त्यांना छावा हा चित्रपट विनामूल्य पाहायचा होता. मद्यधुंद अवस्थेत असताना त्यांनी सिनेमागृहात घुसून थेट तोडफोड चालू केली.

# जाती धर्माच्या नावाखाली जातीवाद वाढला

## काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा पत्रकार परिषदेत आरोप

दैनिक आपला विदर्भ




**मुंबई/प्रतिनिधी :** पुरोगामी महाराष्ट्र आहे सारे गुण्यागोविंदाने राहतात. परंतु, अलिकडे महाराष्ट्रात धर्मावर घाला घातला जातो आहे. जाती धर्माच्या नावाखाली जातीवाद वाढला आहे. विश्र्वशांती जाज्वल्य इतिहास असताना जातीयवाद महाराष्ट्रात पसरला आहे. असे मत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केले. ते माध्यमांशी बोलताना म्हणाले की, सामाजिक सद्भावना कमी होते आहे.त्यामुळे राज्यभर जातीय दंगली आहेत. आज बीड जिल्ह्यातील जातीयवाद परिस्थिती वारंवार समोर येत आहे. बीड बदनाम होतो आहे. हे दु:खद आहे. काँग्रेसची ८ मार्च सद्भावना पदयात्रा बीड जिल्ह्यातुन सुरू होणार स्त्री-पुरुष समानता प्रमाण बीड जिल्ह्यातील महिलांची संख्या सर्वात कमी. सुयोग्य प्रमाण हवे.पहिल्या दिवशी - मस्साजोग मधुन ५१ किलोमीटर पदयात्रा सुरूवात होणार आहे .बीडमध्ये पदयात्रा संपेल भगवान गड, नारायण गडावर सद्भावनेची गाराण घालू. सानेगुरुजी, तुकडोजी महाराज यांच्या मानवतेच्या संदेशाला घेऊन सद्भावना पदयात्रा सुरू होणार आहे. या पदयात्रेत भारत जोडो प्रमाणे अनेक संस्था सहभागी होणार आहेत. मविआच्या नेत्यांशी संवाद साधला जाणार आहे. संमेलन हे साहित्यातुन सद्भावना व्यक्त करण्यासाठी काम करते. परंतु, सध्या जे सुरू आहे. ते गंभीर आहे.प्रांताध्यक्ष म्हणून मी पक्ष बळकट करण्यासाठी प्रयत्न सुरू. उद्याच्या कोर्टाच्या सुनावणी नंतर यथावकाश स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी बाबत निर्णय घेतला जाईल. असे मत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

## कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना तात्पुरता दिलासा

**नाशिक/प्रतिनिधी :** कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे अशी माहिती कृषी मंत्री कोकाटे यांचे वकील अविनाश भिडे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे. अधिक माहिती देताना ते म्हणाले की, अतिरिक्त जिल्हा न्यायालयाने दिलेल्या शिक्षेला तात्पुरती स्थगिती दिली आहे. न्यायमूर्ती नितीन जीवने यांनी निकाल दिला आहे. माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांचे जावई वकील आशुतोष राठोड यांनी घेतलेला आक्षेपही फेटाळला आहे. माणिकराव कोकाटे यांच्या आमदारकीवर टांगती तलवार कायम आहे. मागील आठवड्यात कोकाटे यांना २ वर्षांची शिक्षा आणि ५० हजारांचा दंड अशी शिक्षा सुनावली होती. माजी मंत्री तुकाराम दिघोळे हे साक्षीदार आणि तक्रारदार नव्हते.त्यामुळे जावई आशुतोष राठोड यांना न्यायालयाने फटकारले आहे .उद्या सरकारी पक्षाचे वकील बाजू मांडणार आणि मग अंतिम निर्णय होणार आहे. सुनावणी संपेपर्यंत कोकाटे यांना १ लाख रुपयांचा जामीन मंजूर केला आहे. आमदारकी रद्दबाबत सुनावणी संपेपर्यंत न्यायालयाच्या शिक्षेला स्थगिती दिली आहे. अशी माहिती कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचे वकील अविनाश भिडे यांनी दिली.

CMYK

## दिल्लीत पुन्हा महिला राज

अरविंद केजरीवाल यांच्या आप पक्षाचा दणदणीत पराभव करून भाजपने तब्बल सत्तावीस वर्षानंतर दिल्लीत सत्ता स्थापन केली. दिल्लीत अभूतपूर्व विजय मिळवताच सर्वांना एकच प्रश्न पडला तो म्हणजे दिल्लीचे नवे मुख्यमंत्री कोण ? या प्रश्नांचे उत्तर मिळण्यास काही जवळपास तेरा दिवसांचा कालावधी लागला कारण या कालावधीत पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर होते. पंतप्रधान फ्रान्स आणि अमेरिकेचा दौरा आटोपून आल्यावर भाजपने दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्र्यांची घोषणा केली. दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्र्यांची घोषणा करताना भाजप श्रेष्ठींनी पुन्हा एकदा धक्का तंत्राचा अवलंब करून सर्वांना अचंबित केले. भाजपने मध्यप्रदेश आणि राजस्थानमध्ये धक्कातंत्र राबवून अनपेक्षित असे नवे चेहरे समोर आणून त्यांना खुर्चीवर बसवले त्याच धक्कातंत्राचा वापर करत भाजप श्रेष्ठींनी दिल्लीतही अनपेक्षित नवीन चेहरा समोर आणून त्यांना मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसवले. तो नवा चेहरा म्हणजे दिल्लीच्या विद्यमान मुख्यमंत्री रेखा गुप्ता. वास्तविक निवडणुकीच्या आधी आणि नंतर ही रेखा गुप्ता या मुख्यमंत्र्यांच्या शर्यतीत नव्हत्या. त्या मुख्यमंत्री बनतील असा अंदाज कोणालाच आला नव्हता. कारण मागील दोन विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. भाजप प्रवेश वर्मा यांना मुख्यमंत्री बनवतील असा कयास होता कारण प्रवेश वर्मा हे दिल्लीचे माजी मुख्यमंत्री दिवंगत साहबसिंग वर्मा चिरंजीव. ते माजी खासदार असून दिल्लीतील प्रभावशाली नेते आहेत शिवाय त्यांनी अरविंद केजरीवाल यांचा पराभव केल्याने ते जायंट किलर ठरेलत. ते ज्या जाट समाजाचे आहेत त्यांची संख्या दिल्लीत लक्षणीय आहे मात्र भाजप श्रेष्ठींच्या त्यातही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मनात रेखा गुप्ता यांचे नाव होते. रेखा गुप्ता यांना दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर बसवण्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा मोठा वाटा आहे. संघाची पहिली पसंती रेखा गुप्ता याच होत्या कारण रेखा गुप्ता या विद्यार्थी दशेपासून संघ परिवाराशी जुळलेल्या आहेत. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतून त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली. संघाने त्यांच्यावर ज्या जबाबदाऱ्या दिल्या त्या त्यांनी जबाबदारीने पार पाडल्या. दुसरी महत्वाची गोष्ट त्या महिला आहेत. दिल्लीत मागील काही वर्षात काँग्रेस व आपने महिलांना मुख्यमंत्रीपदाची संधी दिली. काँग्रेसच्या शिला दीक्षित या जवळपास पंधरा वर्ष दिल्लीच्या मुख्यमंत्री होत्या. आपनेही केजरीवाल तुरुंगात गेल्यावर आतिशी या महीलेकडेच मुख्यमंत्रीपदाची सूत्रे सोपवली. इतकेच नाही तर भाजपनेही दिल्लीत सुषमा स्वराज यांच्याकडेच मुख्यमंत्रीपदाची धुरा सोपवली होती. त्यामुळे भाजपने तीच परंपरा राखत रेखा गुप्ता यांच्या गळ्यात मुख्यमंत्री पदाची माळ घातली. रेखा गुप्ता या वैश्य समाजाच्या आहेत. केजरीवाल हेही वैश्य समाजाचे आहेत. मागील पंधरा वर्षापासून दिल्लीतील वैश्य समाज केजरीवालांच्या पाठीशी उभा होता. रेखा गुप्ता यांना मुख्यमंत्री करून भाजपने केजरीवालांकडे गेलेला वैश्य समाज पुन्हा आपल्याकडे वळवला आहे. रेखा गुप्ता यांना मुख्यमंत्री करण्यामागे आणखी एक कारण आहे. भाजप हा आज देशातील सर्वात मोठा पक्ष आहे. देशातील १३ राज्यात आणि एका केंद्रशासित प्रदेशात भाजपची सत्ता आहे मात्र कोठेही भाजपने महिलेला मुख्यमंत्री पदाची संधी दिली नाही. वसुंधरा राजे या भाजपच्या शेवटच्या महिला मुख्यमंत्री होत्या. २०१३ ते २०१८ या कालावधीत त्या राजस्थानच्या मुख्यमंत्री होत्या. २०१८ नंतर अनेक राज्यात भाजपची सत्ता आली मात्र कोणत्याही राज्यात भाजपने महिलेला मुख्यमंत्री बनवले नाही त्यामुळे भाजपवर विरोधी पक्षांकडून टीका होत होती. रेखा गुप्ता यांना मुख्यमंत्री करून भाजपने ती टीका खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे. नाही म्हणायला याआधी भाजपने चार महिलांना मुख्यमंत्री पदाची संधी दिली आहे. स्वर्गीय सुषमा स्वराज यांना दिल्ली, उमा भारती यांना मध्यप्रदेश, वसुंधरा राजे यांना राजस्थान तर आनंदीबेन पटेल यांना गुजरातच्या मुख्यमंत्रीपदी बसवले होते. आता रेखा गुप्ता या भाजपच्या पाचव्या मुख्यमंत्री बनल्या आहेत. रेखा गुप्ता यांना मुख्यमंत्री करून भाजपने एकप्रकारे दिल्लीत महिला राज आणले आहे. आता रेखा गुप्ता यांच्यावर मोठी जबाबदारी आहे. निवडणूक काळात भाजपने दिल्लीकरांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्याचे मोठे आव्हान त्यांच्यापुढे आहे. भाजपने दिल्लीत महिलांना प्रतीमाह ३५०० रुपये रोख देण्याचे आश्वासन दिले आहे. या आश्वासनाला भुलून दिल्लीतील महिलांनी भाजपला भरभरून मते दिली आहेत. आता महिलांना प्रतिमाह ३५०० रुपये देतानाच दिल्लीची तिजोरी रिकामी होणार नाही याचीही काळजी त्यांना घ्यावी लागेल कारण तिजोरी रिकामी झाली तर त्याचा परिणाम विकास कामांवर होतो त्यामुळे दिल्लीकरांना दिलेली आश्वासने पूर्ण करीत विकास कामे करण्याची तारेवरची कसरत त्यांना करावी लागणार आहे.

# गावकरी आंदोलनात सहभागी होणार, सरकारकडून कोणतीही चर्चा नाही : देशमुख

**दैनिक आपला विदर्भ**

**बीड/प्रतिनिधी :** पोलीस अधीक्षकांचा आम्हाला निरोप आला आहे, त्यानुसार गावकरी आणि आम्ही एसपी ऑफिसला जाऊन त्यांची भेट घेणार आहोत. त्यातून पुढील आंदोलनाची दिशा ठरवणार असल्याची माहिती धनंजय देशमुख यांनी दिली. सकारात्मकता दाखवली तर गावकरी विचार करतील. सर्व जण आंदोलनात सहभागी होणार आहेत. साखळी पद्धतीने सर्वजण आंदोलनात सहभागी होतील असे देशमुख म्हणाले. संतोष देशमुख हत्या प्रकरणात न्याय मिळावा, फरार आरोपी कृष्णा आंधळेला लवकरात लवकर अटक करावी, या मागणीसाठी मस्साजोगचे ग्रामस्थ उद्यापासून आंदोलन करणार आहेत.

ठराविक लोकांचा अद्याप निरोप नाही, सर्वजण यात सहभागी होणार आहेत. सरकारचे शिष्टमंडळ भेटीला नाही किंवा निरोप देखील नाही. त्यांची भूमिका वेगळी आणि आम्ही आमच्या भूमिकेवर ठाम आहोत असे देशमुख म्हणाले. गावकरी याबाबत निर्णय घेतील असेही धनंजय देशमुख म्हणाले. सुरेश धस यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काय चर्चा केली याबाबत आम्हाला दुपारनंतर माहिती मिळेल. त्यांनी बोलावले म्हणून आम्ही त्यांच्या भेटीला जात आहोत असेही देशमुख म्हणाले. आमच्या आंदोलनासंदर्भात सरकारकडून कोणतीही चर्चा झाली नसल्याचे धनंजय देशमुख म्हणाले. आपण सरकारच्या नियोजनावर काही बोलू शकत नाही. आम्ही आमच्या नियोजनावर बोलणार असल्याचे देशमुख म्हणाले. आंदोलन करायचं की स्थगित करायचं याबाबतच निर्णय



सर्व गावकरी घेतील असे धनंजय देशमुख म्हणाले.

संतोष देशमुख हत्याप्रकरणी न्याय मिळावा म्हणून बीडच्या मस्साजोगचे ग्रामस्थ पुन्हा एकदा एकवटले आहेत. कृष्णा आंधळेच्या अटकेसाठी या ग्रामस्थांनी करो या मरोचा इशारा दिला आहे. मस्साजोगच्या ग्रामस्थांनी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. लहान मुलं, वयोवृद्ध आणि सर्व गटातील लोकांसह महिलाही या आंदोलनात सामील होणार आहेत. दोन दिवस अन्न त्याग आंदोलन केलं जाईल. या आंदोलनाची दखल घेतली नाही तर पाणी त्याग आंदोलन करण्याचा इशारा या ग्रामस्थांनी दिला आहे. त्यामुळे मस्साजोगचं आंदोलन आणखी उग्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष पंडितराव देशमुख यांचं ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण करण्यात आलं आणि त्यानंतर त्यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर केज आणि मस्साजोग या ठिकाणी आंदोलन करण्यात आलं होतं. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांसह मस्साजोगच्या ग्रामस्थांनीही या हत्या प्रकरणाचा लवकरात लवकर तपास करुन आरोपींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. डोणगावच्या टोलनाक्यावर अचानक एका चारचाकी गाडीकडून संतोष देशमुख यांच्या गाडीला अडवण्यात आलं होतं. त्या गाडीतून ५ ते ६ तरुण खाली उतरले आणि संतोष देशमुखांच्या गाडीवर दगडफेक करु लागले. त्यानंतर त्यांनी संतोष देशमुखांना गाडीतून खाली ओढून काठ्या, लोखंडी रॉड तसंच कोयत्यानं मारहाण करायला सुरुवात केली आणि लगेचच त्यांच्या गाडीत टाकून घेऊन गेले. त्यानंतर देशमुखांची आरोपींनी हत्या केल्याची घटना घडली होती. या घटनेवरुन राजकी वातावरण चांगलच तापलं आहे. विशेष म्हणजे भाजप आमदार सुरेश धस यांनी हे प्रकरण चांगलच लावून धरलं आहे.

# स्वमान: मायक्रोफायनान्ससह शाश्वत भविष्याकडे नेणारा मार्ग

**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी :** कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना आर्थिक सेवा देऊन भारतात आर्थिक समावेशन वाढविण्यात मायक्रो फायनान्स ने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. महिला सक्षमीकरणासाठी हे एक महत्त्वाचे साधन बनले आहे, जे जीवन आणि समुदायांमध्ये परिवर्तन घडवून आणणाऱ्या संधी प्रदान करते.

महाराष्ट्रातील चाळीसगाव येथील धाडसी महिला रत्ना देवी यांच्या बाबतीत. एका विनाशकारी घटना घडली, त्याचे पती गमावल्यानंतर, रत्ना यांना दोन मुलांचे संगोपन स्वतः करावे लागले. या प्रचंड आव्हानाला तोंड देताना, तिला तिच्या मुलांसाठी त्यांचे जीवन पुन्हा उभे करण्यासाठी मायक्रो फायनान्स ची ताकद मिळाली. अडचणी असूनही, रत्नाने उदरनिर्वाहासाठी अनेक अर्धवेळ नोकऱ्यांमध्ये अथक परिश्रम केले. हळूहळू, तिच्या कष्टाचे फळ मिळू लागले आणि तिच्या मोठ्या मुलाला एका बांधकाम दुकानात नोकरी मिळाली.

आपल्या मुलाचे स्वतःचा व्यवसाय करण्याचे स्वप्न साकार करण्यास मदत करण्याचा दृढनिश्चय करून, रत्नाने कर्जासाठी स्वमान फायनान्शियल सर्व्हिसेसशी संपर्क साधला. स्वमानच्या सोप्या, परवडणाऱ्या आणि तारणमुक्त कर्जामुळे रत्नाला वेळेवर आवश्यक असलेली आर्थिक मदत मिळाली. कर्जाच्या मदतीने, तिच्या मुलाने स्वतःचे दुकान सुरू केले, जे लवकरच कुटुंबासाठी उत्पन्नाचे एक विश्र्वसनीय साधन बनले.

तिच्या मुलाच्या यशाने प्रेरित होऊन, तिने शेळीपालन व्यवसाय सुरू करण्यासाठी स्वमानकडून दुसरे कर्ज घेतले, ज्यामुळे तिला घरून काम करता आले आणि उत्पन्नाचा दुसरा स्रोत निर्माण करता आला. रत्ना आता आशेने बोलते: माझ्या पतीच्या अकाली निधनाने माझे आयुष्य उद्ध्वस्त झाले. माझ्या मुलांचे संगोपन करण्याची जबाबदारी सतत चिंतेचा विषय होती पण स्वमानच्या मदतीने मी माझ्या मुलांचे संगोपन करू शकलो आणि कुटुंबाचे स्थिर उत्पन्न सुनिश्चित करू शकलो. आमच्या दोन्ही व्यवसायांनी आमचे जीवन बदलून टाकले आणि यासाठी मी स्वमानचा खूप आभारी आहे. भविष्यात आपल्यासाठी काय आहे हे पाहण्यासाठी मी उत्सुक आहे.

## विकी कौशल स्टारर 'छावा' चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर केला धमाका

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता विकी कौशल अभिनीत 'छावा' चित्रपटाची जादू देशात पाहायला मिळत आहे. या चित्रपटानं दुसऱ्या आठवड्यात धमाकेदार कलेक्शन केलंय. छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याची कहाणी प्रेक्षकांना आकर्षित करत आहे. हा चित्रपट पाहण्यासाठी चित्रपटगृहांमध्ये खूप गर्दी होताना दिसत आहे. भारतीय बॉक्स ऑफिसवरच नाही तर जगभरातही हा चित्रपट खूप गाजत आहे. 'छावा'नं रिलीज झाल्यापासून बॉक्स ऑफिसवर अनेक विक्रम मोडले आहेत.

सध्या हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर रिलीज झालेल्या सर्व चित्रपटाच्या मेहनतीवर विरजण टाकताना दिसत आहे. 'छावा'नं रिलीजच्या १०व्या दिवशी बॉक्स ऑफिसवर धमाका केला आहे.

'छावा'नं रिलीजच्या पहिल्या दिवशी ३३.१ कोटीची कमाई केली होती. आता ओपनिंग डेटपेक्षा 'छावा'नं दुसऱ्या शनिवारी आणि रविवारी धमाकेदार कमाई केली आहे. या चित्रपटानं नवव्या दिवशी ४४ कोटीची कमाई केली. यानंतर दहाव्या दिवशी 'छावा'नं ४० कोटी कमावले. 'छावा' चित्रपटानं आतापर्यंत बॉक्स ऑफिसवर ३२६.७५ कोटींचा गल्ला जमा केला आहे. तसेच या चित्रपटाचं जगभरातील कलेक्शन ४०० कोटीहून अधिक असेल, असा अंदाज लावल्या जात आहे. मॅडॉक फिल्म्स निर्मित हा चित्रपट लवकरच ५०० कोटीच्या क्लबमध्ये प्रवेश करेल अशी अपेक्षा केली जात आहे.

'छावा' या चित्रपटाचं दिग्दर्शन लक्ष्मण उतेकर यांनी केलं आहे. या चित्रपटाची निर्मिती दिनेश विजान यांनी केली आहे. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर १४ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित झाला होता.

# पारधी समाजाच्या लाभार्थ्यांना व्यवसायासाठी अर्थसहाय्य; १० मार्चपर्यंत अर्जाची मुदत

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, अकोला कार्यालयाच्या जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम योजनेंतर्गत पारधी समाजाच्या लाभार्थ्यांना व्यवसायासाठी अर्थसहाय्य देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत अनुदान किंवा अर्थसहाय्यासाठी पारधी, फासेपारधी समाजाच्या लाभार्थ्यांनी दि. २४ फेब्रुवारी ते १० मार्च या कालावधीत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या योजनेचे छापील अर्ज विनामुल्य लाभार्थ्यांना देण्यात येईल. तसेच प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अकोला या कार्यालयास अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. १० मार्चपर्यंत असून या मुदतीपर्यंत अर्ज स्विकारण्यात येतील. त्यानंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

योजना : पारधी समाजाच्या दारिद्र रेषेखालील लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर शेळीपालन व्यवसायकरिता ५ शेळी १ बोकडे खरेदी करीता अर्थसहाय्य करणे, या योजनेंतर्गत डीबीटीव्दारे लाभ दिले जातील. २. पारधी समाजाच्या दारिद्र रेषेखालील लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर कुकरीज (डीनर सेट) व्यवसायाकरिता अर्थसहाय्य करणे.

अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे : पारधी व फासेपारधी जमातीचा दाखला प्रमाणपत्र, आधार कार्ड, बँक खाते क्रमांक व आयएफएससी कोड, दारिद्ररेषेचे कार्ड असल्यास, तहसिलदारांचा उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, रेशनकार्ड, पासपोर्ट फोटो, विधवा असल्यास प्रमाणपत्र सादर करावे, दिव्यांग प्रमाणपत्र,परितक्ता प्रमाणपत्र असल्यास सादर करावे, असे आवाहन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांनी केले आहे.

पान १ वरून...

## येत्या नवीन शैक्षणिक वर्षापासून

वाहतूक करतात. परंतु प्रत्यक्षामध्ये पूर्ण वर्षाचे शुल्क एकाच वेळी संबंधितांकडून आकारले जाते. ते अवाजवी आहे. तसेच शालेय शुल्क व स्कूल बस शुल्क एकाच वेळी पालकांकडून आकारले जात असल्यामुळे त्याचा प्रचंड मोठा आर्थिक बोजा पालकांच्या खिशावर पडतो. जे अत्यंत अन्यायकारक आहे. असे अनेक पालकांचे म्हणणे होते. त्याऐवजी संबंधित स्कूल बस चालकांनी केवळ दहा महिन्यासाठीचे विद्यार्थी वाहतुकीचे शुल्क एकाच वेळी न घेता दर महिन्याला स्वीकारावे, असे मत पालकांनी व्यक्त केले आहे.

मध्यंतरी पनवेल आणि बदलापूर सारख्या ठिकाणी घडलेल्या घटना या अत्यंत अप्रिय आणि धोकादायक असून विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता प्रत्येक बस मध्ये पॅनिक बटन, आग प्रतिबंधक स्पिंकलर, ऋझड यंत्रणा, उउढत कॅमेरा आदी उपकरणे असणे आवश्यक आहे. तसेच ज्या संस्था अथवा स्कूल बस चालवणारे चालक पालकांकडून विद्यार्थी वाहतुकीची शुल्क आकारतात, त्यांच्याकडे बसेस मधील सीसीटीव्ही कॅमेराचे एकात्मक नियंत्रण असणे आवश्यक आहे. जेणेकरून बसमध्ये भविष्यात विद्यार्थ्यांच्या बाबतीत कोणतीही अप्रिय दुर्घटना घडणार नाही. या सर्व सुचनांचा विचार करून पाटील समितीने आपला अहवाल सादर करावा, अशा सूचना मंत्री सरनाईक यांनी दिल्या आहेत.

## अपघातानंतर मोटर पेटून दोघांचा

धनंजय नरेश गुडवाल, (३५) व महादेव दत्ताराम काळे, (२८ वर्षे, रा. आदित्य मंगल कार्यालय शेजारी, बीड रस्ता जामखेड) अशी दोघा मृतांची नावे असल्याची माहिती जामखेड पोलिस ठाण्याचे निरीक्षक महेश पाटील यांनी दिली.

महादेव काळे व पोलीस कर्मचारी धनंजय गुडवाल हे दोघे आज पहाटे ४ च्या सुमारास मोटारीतून (एमएच १६ डीएम ३८५३) जामखेड शहराकडे येत होते. मोटार एका हॉटेलसमोरील दुभाजकाला धडकली व मोटारीने पेट घेतला. अत्याधुनिक पध्दतीमुळे मोटारीचे दरवाजे लॉक झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळे मोटारीतील दोघांना बाहेर पडता आले नाही. त्यातच दोघांचा मोटारीतच जळुन दुर्दैवी मुत्यू झाल्याचा अंदाज वर्तवला जातो.

घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी हे त्या ठिकाणी आले. यानंतर जामखेडचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनीही आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. जामखेड नगर परिषदेच्या अग्निशमन दलाने आग विझवली. अग्नीशमन दलाचे आय्यास शेख, विजय पवार, अहमद शेख या जवानांनी त्यासाठी प्रयत्न केले. मोटार पूर्ण जळुन खाक झाली. दोघांचाही जागीच मृत्यू झाला होता.घटनास्थळी कर्जतचे उपविभागीय पोलीस अधिकारी विवेकानंद वाखारे यांनी भेट देऊन पाहणी केली. घटनास्थळीच वैद्यकीय अधिकारी डॉ. शशांक शिंदे यांनी शवविच्छेदन केले. अपघातील मृत महेश काळे याचे बीड रस्त्यावर साईनाथ पान शॉप दुकान आहे. अधिक तपास तपास पोलीस निरीक्षक महेश पाटील करत आहेत. जामखेड-सौताडा राष्ट्रीय महामार्गाचे काम दोन वर्षापासून अपुर्ण आहे. दिशादर्शक फलक, रेडियम कुठेही नाहीत, मधेच काही ठिकाणी डिव्हाइडर तसेच डिव्हाइडरसाठी सोडलेल्या जागेवर खड्डे यामुळे अनेक अपघात होतात. यामुळे लवकरात लवकर रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी केली आहे.

## उष्माघाताचा पहिला बळी सांगलीत

उन्हाळ्याची धग जाणवू लागली असून तीव्र तापमान बदलाची सुरुवात झाल्याने तापमानात वारंवार चढउतार होत आहेत. त्यामुळेच वाढत्या आरोग्याच्या कुरबुरी सुरु झाल्या असून संसर्गजन्य आजारांची लागण होत आहे. दरम्यान, आता राज्यात उन्हाचा ताप वाढू लागलाय. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, महाराष्ट्रात येत्या ३ ते ४ दिवसांत किमान व कमाल तापमानात २-३ अंशांनी वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली. सोलापूर आणि नागपूरमध्ये तापमानाने ३५ अंश सेल्सियसचा आकडा पार केला आहे. दरम्यान, यंदा शाळेसाठी उन्हाळ्याच्या सुट्ट्या ४५ दिवसांच्या जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे, ४५ दिवस शाळा बंद असणार आहेत. उन्हाळ्यात विद्यार्थ्यांना उन्हाची दाहकता सहन करावी लागू नये म्हणून शासनाकडून दरवर्षी उन्हाळ्याच्या सुट्ट्या देण्यात येतात.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### गँग ऑफ डोंबिवलीचा आका ठाण्यात आहे मनसे नेते राजू पाटील यांचा आरोप : शिंदे पिता पुत्रांवर नाव न घेता केली टीका



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** अनधिकृत बांधकाम करणाऱ्या, कागदपत्र बनवणाऱ्याना, लोकांची फसवणूक करणाऱ्या ठाण्यातून अभय मिळत आहे. ६५ बेकायदा इमारत असून गँग ऑफ डोंबिवलीचा आका ठाण्यात आहे. अशी टीका मनसे नेते राजू पाटील यांची शिंदे पिता पुत्रांवर नाव न घेता केली. यावेळी ते मध्यभागी बोलताना म्हणाले की, सेलेब्रिटीच्या घरी जायला वेळ आहे. मात्र, ६५ इमारती मधील राहिवाशाना भेटायला वेळ नाही. इथले पालकमंत्री आहात, नगरविकासमंत्री आहात, तुमचा मुलगा इथला खासदार आहेत. गंगेत डुबकी मारून पुण्य मिळवण्यापेक्षा या राहिवाशांना येऊन भेटा जास्त पुण्य मिळेल, असे पाटील म्हणाले. विधानसभा निवडणुकीत संबंधित बिल्डरला इमारत तोडण्याची धमकी देत काम करायला लावले. ही चैन जोपर्यंत तोडत नाही तोपर्यंत इथे काही होणार नाही. गँग ऑफ डोंबिवलीचा आका ठाण्यात आहे. येथील रहिवाशांच्या पाठीशी मनसे उभी आहे, त्यांना कायदेशीर सल्ला देण्यासाठी लागणारी आर्थिक मदत करू. मात्र, यांना दिलासा कसा देणार या प्रकरणी मंत्री गणेश नाईक यांना भेटणार, फडणवीस यांच्याकडून न्यायाची अपेक्षा आहे. असे मत मनसे नेते, माजी आमदार राज पाटील यांनी व्यक्त केले.

### जालना बाजार समितीत आतापर्यंत ७७ हजार ११३ क्विंटल हरबऱ्याची आवक



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** दिनांक २४ रोजी मिळालेल्या माहितीनुसार जालना बाजार समितीत यंदा हरबऱ्याची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. आतापर्यंत ७७ हजार ११३ क्विंटल हरबऱ्याची आवक जालना बाजारात झालीय. ७ हजार ५०० ते ६ हजार २०० रुपये प्रति क्विंटल असा भाव सध्या जालना बाजारात हरबऱ्याला मिळत आहे. गेल्या वर्षी जालना बाजार समितीत फक्त ७ हजार ५६९ क्विंटल हरबऱ्याची आवक झाली होती आणि त्याला सुमारे ६ हजार ५०० ते ६ हजार ४०० रुपये प्रति क्विंटल असा दर मिळाला होता. यंदा, मात्र जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात हरबरा लागवड केल्याने हरबऱ्याचे लागवड क्षेत्र वाढले आणि परिणामी जालना बाजारात हरबऱ्याची आवक वाढल्याच चित्र पाहायला मिळत आहे.

### महसूल विभागातील सुनवण्या घेताना ए आय चा वापर पुढील काळात होईल-चंद्रशेखर बावनकुळे




दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे नांदेड दौऱ्यावर गेलेले असताना महसूल विभागातील कर्मचाऱ्यांनी नाविन्यपूर्ण कल्पनेवर काम करावे शासनाला आपल्याकडच्या अशा नाविन्यपूर्ण कल्पनेची माहिती द्यावी नव्या तंत्रज्ञानाचा वापर करावा महसूल विभागातील सोनवण्या घेताना ए आय वापर पुढील काळात होईल सुनवण्यामध्ये ए आय तंत्र अतिशय उपयुक्त ठरणार असून निकाल पत्रासाठी ए आय ची मदत घेऊ अशी घोषणा ही त्यांनी यावेळी केली गेल्या दहा वर्षात बारा हजार प्रकरणे महसूल विभागात निर्णयासाठी पडून आहेत रोज शंभर सुनवण्या घेतल्या तरी ते कमी होणार नाहीत त्यामुळे ए आय ची मदत घेणे काळाची गरज आहे असे ते म्हणाले नांदेड येथे बारा वर्षाच्या प्रदीर्घ काळानंतर आयोजित क्रीडा स्पर्धेसाठी जिल्हाधिकारी राहुल कडील व टीमचे त्यांनी अभिनंदन केले. राज्यस्तरीय महसूल क्रीडा स्पर्धेसाठी एक कोटी अनुदान दरवर्षी देणार व दरवर्षी राज्यस्तरीय महसूल क्रीडा महोत्सव होईल अशी घोषणा उपस्थित खेळाडूंच्या समक्ष त्यांनी केली.

# इतर पक्ष गोऱ्हे यांच्यावर का नाही बोलत : सुषमा अंधारे

दैनिक आपला विदर्भ




**पुणे/प्रतिनिधी :** नीलम गोरे यांना मी चांगल्या प्रकारे ओळखत असून त्याच्यावर इतर पक्ष का बोलत नाही असा प्रश्न आहे असे मत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी माध्यमंशी बोलताना व्यक्त करेल नीलम गोरे यांच्यावर चांगलीच टीका केली.

त्यापुढे म्हणाल्या की, गोऱ्हे यांनी त्यांच्या कामाची सुरुवात करताना एस एफ आय मधून केली. नंतर भारिपमध्ये उडी मारली.प्रकाश आंबेडकर यांच्यामुळे त्यांना ओळख मिळाली. ईमानदारी, प्रामाणिकपणा त्यांच्या शब्दकोशात नाही. प्रकाश आंबेडकर यांच्याशी त्यांनी बेइमानी केली.

पवार साहेबांकडे आणि त्यांच्या पक्षाशी बेइमानी केली.मग त्या आमच्याकडे आल्या, त्या जिथे राहतात, त्यांनी एक ढाका उभी केली नाही, लोकांना कसे बाजूला ठेवता येईल हे काम त्यांनी केले.२०१७ ते २०२२ पर्यंत त्यांनी माझा पक्षात प्रवेश होऊ दिला नाही.२ मर्सिडीज दिल्या असं म्हणत असतील तर त्यांनी त्यांच्या २ मर्सिडीज कुठून आणल्या? त्यांचा कुठली मालमत्ता आहे. जी २५० करोड ची आहे. त्याची मालमत्ता आता तपासावी लागेल.

साहित्य संमेलनामध्ये ज्याला बोलावले जाते त्याचा किमान चारोळी लिहली असावी मग त्यांना तिथे कशाला बोलावले होते. साहित्य मंडळाने त्यांना साहित्य संमेलनाचे निमंत्रण कशाचे दिले होते. शिवसेनेवर बोलण्याचा प्रयत्न अतिशय केविळवाणा आहे. गोऱ्हे यांच्यासारखा व्यक्तीला पैशाची गद्दार नाही. त्यांनी अनेक पदे भूषवली म्हणजे अनेक मर्सिडीज चे किंमत त्यात होती. हा अब्रू नुकसानीचा दावा किती असेल, त्याची रक्कम किती असेल हे संध्याकाळपर्यंत कळवले जाईल, असेही त्या म्हणाल्या.एकनाथ शिंदे आणि नीलम गोऱ्हे यांनाच माहिती असेल की कलेक्शन किती होते.

निलम गोऱ्हे यांनी त्यांचे म्हणणे कोर्टात सादर करावे नाहीतर नाक घासून माफी मागावी. निलम गोऱ्हे यांनी कर्तृत्व नसताना अनेक पदे भूषवली. मला वेळ आणू नका, भारिप मध्ये असताना तेव्हापासून ते आत्तापर्यंत त्यांनी काय काय केले.मला या गोष्टी बाहेर काढाव्या लागतील.

इतर पक्ष गोऱ्हे यांच्यावर का नाही बोलत हा सुद्धा एक प्रश्न आहे.मला अपेक्षा नाही की कोणी त्यावर काय प्रतिक्रिया द्यावी नाही द्यावी. राष्ट्रवादी, काँग्रेस काय बोलते याची वाट बघणार्यांपैकी आम्ही नाही. ज्यांना त्याचसोबत मंच शेअर करायचे आहेत, जण त्यांचा पाहुणचार, स्तुती सुमने करायची आहेत, ते करू देत आमची लढाई लढण्यासाठी आम्ही सक्षम आहोत. राज ठाकरे, उद्धव ठाकरे हे भाऊ आहेत. हे कौटुंबिक नातं आहे ते किती ही वेळा एकत्र येऊ शकतात. ते ३ नाही ३३ वेळा भेटू द्या त्यांचे कौटुंबिक संबंध आहेत. असे मत उबाठा शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांनी व्यक्त केले.



## माझा वेंगुर्ला या संस्थेने सलग ९ व्या पतंग महोत्सवाचे यशस्वी आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** माझा वेंगुर्ला या संस्थेने सलग ९ व्या पतंग महोत्सवाचे यशस्वी आयोजन वेंगुर्ले-सागरेश्र्वर बीच वर केले होते. या महोत्सवात जगभरात लोकप्रिय ठरणाऱ्या फ्लाय ३६० डहाणू आणि टीम मेंगलोरच्या सदस्यांनी विविधांगी पतंगबाजीचे प्रदर्शन घडवत अलौकिक आनंदाची अनुभूती उपस्थितांना दिली.

माझा वेंगुर्ला या संस्थेने सागरेश्र्वर बीचवर या पतंग महोत्सवाचे आयोजन केले होते. वेंगुर्ल्याचा समुद्रकिनारा आकाशात झेपावणाऱ्या विविध आकाराच्या रंगीबेरंगी पतंगांनी व्यापून गेला होता. शेकडो पतंगप्रेमी तसेच पर्यटकही या महोत्सवात सामील झाले होते. या महोत्सवामध्ये उभादांडा ग्रामपंचायत आणि सागरेश्वर येथील ग्रामस्थांनी सहकार्य केले. या पतंग महोत्सवामुळे वेंगुर्ल्याच्या पर्यटन विकासाला चालना मिळणार आहे.

## संतोष देशमुख हत्या प्रकरणात सरकार निर्दयी झालेल आहे- रविंद्र चव्हाण

**नांदेड/प्रतिनिधी :** संतोष देशमुख हत्याकांडाला भरपूर वेळ झालेला आहे. खरंतर अधिक जलद गतीने चौकशी झालेली पाहिजे होती परंतु ती चौकशी झालेली दिसत नाही आहे. आज संतोष देशमुख यांच्या परिवाराला आणि गावाला अन्नत्याग करावा लागत आहे. मला वाटतं सरकार ऐवढ कठोर आणि निर्दयी झालेल आहे की एखाद्या हत्या प्रकरणात फास्टँकवर घेऊन ते आरोपी आहेत ते लवकरात लवकर अटक करून त्यांचा छड लावायला पाहिजे होता पण सरकार तसं करताना दिसत नाही



## वंचित बहुजन आघाडीचे रमाई घरकुल आवास योजनेच्या यादी प्रसारित करण्यासाठी महानगरपालिकेसमोर आमरण उपोषण सुरू





दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** रमाई घरकुल आवास योजनेच्या मागील आठ ते दहा महिन्यापूर्वी त्या सेवाभावी संस्थेतर्फे झालेले सर्वेक्षण लोकशिक्षण प्रसारक मंडळामार्फत पुन्हा न करता त्या झालेल्या सर्वेक्षणाची यादी तात्काळ प्रसारित ऑनलाईन पद्धतीने प्रसिद्ध करण्यात यावी यासाठी महानगरपालिकेसमोर आमरण उपोषण सुरू आहे

रमाई आवास घरकुल योजनेच्या अंतर्गत मागील आठ ते दहा महिन्यापूर्वी दिलेल्या त्या सेवाभावी संस्थेमार्फत घरांचे सर्वेक्षण करण्यात आले घरकुल लाभधारकांच्या घरांच्या त्रिसर सर्वे होऊन देखील आज पुन्हा त्याच घराचे सर्वे लोक शिक्षण प्रसारक मंडळ या नवीन एजन्सी मार्फत करण्यात येत आहे ते तात्काळ थांबवण्यात यावे व त्याग सेवाभावी संस्था या एजन्सी मार्फत झालेल्या सर्वेक्षणाची यादी तात्काळ प्रसारित करण्यात यावी एक वर्षापासून जे गोरगरीब घरकुल लाभायक आहे त्यांना त्याचा लाभ घेता येईल व त्यांचे लवकर घर पूर्ण पणे बांधले जाईल. यासाठी ऑनलाइन पद्धतीची यादी लवकरात लवकर प्रसारित करावी यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने मनपा समोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.

## ठाण्यात एका मारुती कारला अचानक आग, कोणतीही जिवतहानी नाही



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाण्यातील पेट्रोल जवळ एका मारुती कारला अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाळी असून याठिकाणी बघ्याची गर्दी मोठ्या प्रमाणात झाली होती तर अग्निशामक दलाच्या दोन गाड्यांनी मिळून ही आग आटोक्यात आणली आणि या घटनेमध्ये कोणीही जखमी नसल्याचे महानगरपालिकेच्या अग्निशामक खात्याच्या कर्मचाऱ्यांनी सांगितले ही आग रस्त्याच्या मधोमध लागल्याने फार वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र देखील दिसत होते.

# सोलापुरात ६० वर्षीय आजोबांनी फुलवली नारळाची बाग

दैनिक आपला विदर्भ






**सोलापूर/प्रतिनिधी :** नारळ म्हटल की आपणास कोकणाची आठवण होते. परंतु सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील कूरुल या गावात ६० वर्षीय आजोबांनी नारळ बाग फुलवली आहे. पण ही किमया कुरुल गावातील विष्णू तुकाराम ननवरे यांनी साधली आहे.नारळाच्या या बुटक्या जातीने सर्वांचे लक्ष वेधले आहे. या संदर्भात अधिक माहिती साठ वर्षे आजोबा विष्णू ननवरे यांनी दिली. शेतकरी विष्णू तुकाराम ननवरे रा. कुरूल ता. मोहोळ जि.सोलापूर असे नारळाच्या या बुटक्या जातीच्या शेती करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे. विष्णू ननवरे यांचे शिक्षण १९६९ ला अकरावी पर्यंत झाले आहे.

सोलापूरातील विष्णु ननवरे या आजोबांनी तज्ज्ञांच्या मदतीने ४० डिग्री सेल्सीयस तापमानात त्यांनी ही नारळाची बाग एका एकरात फुलवली. एका एकरात नारळाच्या झाडांची रोप १५ बाय १५ वर लागवड केली आहे. एका एकरात १४५ नारळाची रोपाची लागवड त्यांनी केली आहे. एका नारळाच्या झाडापासून विष्णू ननवरे यांना शंभर पेक्षा अधिक नारळ मिळत आहे. ही नारळाची बाग तयार करण्यासाठी ननवरे यांना ७० ते ७५ हजार रुपये पर्यंत खर्च आला आहे. तसेच विष्णू ननवरे यांनी या नारळाच्या बागेत दोन वेळा कांदा आणि मेथीच्या भाजीचे आंतरपीक घेऊन दोन वर्षात दोन लाखाचा उत्पन्न देखील त्यांनी मिळवला आहे.

३० रुपये दराप्रमाणे एका झाडापासून जवळपास ५ ते ६ हजारांचा फायदा होतो. तर १०० झाडे वर्षाकाठी ५० ते ६० हजारांचे उत्पादन देतात. तर १४५ झाडे एकरी ४ ते ५ लाखांचे उत्पादन देतात. ही नारळ तुम्ही अगदी हाताने तोडू शकता. या झाडाला भरपूर नारळ येतात. या झाडांची उंची अगदी कमी असल्याने तोडणीला अडचण येत नाही. नारळ हे शरीरासाठी अमृत असल्याने त्याची हातोहात विक्री होते. विष्णू ननवरे यांच्या नारळाच्या बागेचा पंचक्रोशीतच नाही तर सोलापूर जिल्ह्यात कौतुक होत आहे.

# केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली दुबईतील अबुधाबी येथे २३ फेब्रुवारीला साजरा झाला शिवजयंती उत्सव

## शिवरायांचा इतिहास प्रेरणादायी आणि स्फूर्तीदायक : केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव






**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास प्रेरणादायी आणि समाजाला स्फूर्तीदायक असल्याच प्रतिपादन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी अबुधाबी येथे केलं

आखाती देशांमध्ये स्थायिक झालेल्या नवीन मराठी पिढीला इतिहासाची ओळख व्हावी या दृष्टिकोनातून दुबईतील अबुधाबी येथे इन्स्पायर इव्हेंट अँड प्रमोशन व भारतीय स्थानिक रहिवाशी यांच्या संयुक्त विद्यमाने २३ फेब्रुवारीला बी ए पी एस हिंदू मंदिर अबुधाबी येथे शिवजयंती उत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव हे होते तर अतिथी म्हणून मालोजी राजे शाहू छत्रपती, खासदार बजरंग सोनवणे उपस्थित होते.अध्यक्षीय भाषणात बोलताना केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा गौरवशाली असून आजच्या ही पिढीला प्रेरणा आणि स्फूर्ती देणारा स आहे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राजवटीमध्ये लोकांच्या हिताची कामे केलीत. अशा स्वरूपाची कामे भारतात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं सातासमुद्र पार ही छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्सव साजरा केला जातो हे मराठी माणसासाठी आणि आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

या कार्यक्रमाला शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथरावजी शिंदे हे सुद्धा येणार होते त्यांच्या नियोजित कार्यक्रमामुळे त्यांनी मला या कार्यक्रमाला जावं अस आवर्जून सांगितल्याचे ही प्रतापराव जाधव म्हणाले. अबुधाबी येथील मराठी माणसांसोबत त्यांनी संवाद साधला या कार्यक्रमाला अबुधाबी येथील मराठी कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दुबई येथे महाराष्ट्र सदन बांधण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करणार: केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव

आखाती देशात स्थायिक झालेल्या मराठी लोकांना एकत्र येऊन सामाजिक कार्यक्रम साजरी करता यावे यासाठी दुबईत महाराष्ट्र सदन बांधण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र स्तरातून प्रयत्न करणार असल्याची ग्वाही केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी अबुधाबी येथे नागरिकांशी संवाद साधताना दिली यावेळी उपस्थित त्यांनी जय भवानी जय शिवराय चा जयघोष करून घोषणेच स्वागत केलंय..

## विविध वृत्त...

### कृतज्ञता सोडून अशी वक्तव्य करणे म्हणजे शुद्ध नीच पणा आहे नीलम गोऱ्हेंवर टीका - जयश्री शेळके



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** स्वाभिमानाच जगणे सोडून अचानक लाचारी पत्करावी लागली की आलेल्या नैरस्यातून अशा प्रकारची वक्तव्य येतात. तसंच वाटतं नीलम गोऱ्हे यांनी केलेलं आहे. काही गद्दारांनी शिवसेना पक्षप्रमुखांसोबत गद्दारी केल्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आपल्या मुख्यमंत्री पदाचा ताबडतोब राजीनामा दिला. परंतु अजूनही ठाकरे या नावाचा दरारा या महाराष्ट्रात कायम आहे. आजही गद्दारांना त्यांच्या नावाने घाम फुटतो. त्यामुळेच एका पदासाठी दोन मर्सिडीज द्याव्या लागत होत्या असं वक्तव्य करणं म्हणजे अजूनही यांचा रोजगार ठाकरे या नावाशिवाय पूर्ण होत नाही. ज्या पक्षाने ज्या शिवसेना पक्षप्रमुखांनी नीलम गोऱ्हे यांना अनेक पद दिली मानसन्मान दिला पक्षांमध्ये ओळख दिली पक्षप्रमुखा प्रति शिवसेना पक्षाच्या प्रती कृतज्ञता करायची सोडून अशा प्रकारची वक्तव्य करणे म्हणजे शुद्ध नीच पण आहे. अशी प्रतिक्रिया शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या नेत्या जयश्री शेळके यांनी दिली आहे.

### केसगळती पाठोपाठ बुलढाण्यात आढळला जीबीएसचा दुसरा रुग्ण



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केसगळती व टक्कल आजाराचा धोका अजूनही टळला नसताना जिल्ह्यात आता जीबीएसचा दुसरा रुग्ण आढळून आला आहे. यामुळे नागरिकांसह आरोग्य यंत्रणात खळबळ उडाली आहे. मागील दोन महिन्यात देऊळगाव राजा तालुक्यातील नारायणखेड येथील नववर्षीय बालकाला ऋइड ची लागण झाली होती.त्याची प्रकृती उत्तम असून त्याला रुग्णालयातून डिचार्ज देण्यात आला आहे तर मागील आठवड्यात जळगाव जामोद तालुक्यातील खेर्डा बुद्रुक येथील साडे आठ वर्षाचा बालकाला ऋइड ची लागण झाली असून त्याच्यावर अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू आहे. तर जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नसून पण काही लक्षणे आढळून आल्यास ताबडतोब नजीकच्या दवाखान्यांमध्ये जाऊन उपचार करावे असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांनी केले आहे.

### अतिथी निदेशक या पदावर तात्काळ रुजू करण्याच्या मागणीसाठी महिलेचे जिल्हा परिषदेसमोर आमरण उपोषण



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील रोहना येथील जिल्हा परिषदेच्या हायस्कूल येथे अतिथी निर्देशक या पदावर विशाखा सावंत यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र जिल्हा परिषद हायस्कूल रोहना येथील मुख्याध्यापिका यांनी शासन निर्णय आणि वरिष्ठांच्या आदेशाची अवहेलना केली. असल्याचा आरोप करत मुख्याध्यापिकेवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी. व अतिथी निदेशक या पदावर तात्काळ रुजू करण्यात यावे या मागणीसाठी विशाखा सावंग यांनी आज पासून बुलढाणा जिल्हा परिषदेसमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

## बुधवारचे दिव्यांग तपासणी शिबीर रद्द

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा रूग्णालयात नियमितपणे बुधवारी दिव्यांग तपासणी शिबीर घेण्यात येते. मात्र बुधवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री निमित्त शासकीय सुट्टी असल्यामुळे शिबीर रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी तपासणीसाठी येऊ नये, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बि.एस. भुसारी यांनी केले आहे.



## माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर शिक्षकांचे आंदोलन

**यवतमाळ/प्रतिनिधी :** सेवानिवृत्त व कार्यरत शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्र्नाकडे माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे. यामुळे संतप्त झालेल्या शिक्षकांनी आमदार सुधाकर आडबले यांच्या नेतृत्वात धरणे आंदोलन केले. माध्यमिक शिक्षण विभाग कार्यालयातील वेतन पथक शिक्षकांची अडवणूक करते. याला शिक्षणाधिकाऱ्यांकडून पाठबळ दिले जात असल्याचा आरोप आहे. अधिवेशनात तारांकित प्रश्र्न उपस्थित करण्यात येणार असल्याची माहिती आमदार आडबले यांनी दिली.

## नरेंद्राचार्य महाराजांबद्दल वादग्रस्त वक्तव्य प्रकरणी विजय वडेट्टीवार यांच्याविरोधात बुलढाण्यात तीव्र निदर्शने





**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज यांचा एकेरी उल्लेख करत आक्षेपार्ह वक्तव्य केलं होतं. दरम्यान, या अपमानास्पद वक्तव्यावरून विविध स्तरांतून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या पार्श्र्वभूमीवर राज्यातील अनेक भागात आता तीव्र पडसाद उमटत असून नरेंद्र महाराजांच्या अनुयायांनी आणि भक्तांनी रस्तावर उतरत आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. बुलढाणा जिल्ह्यात देखील काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांचा बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नरेंद्र महाराजांच्या अनुयायांनी आणि भक्तांनी कडाडून निषेध नोंदवत त्यांनी माफी मागावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करू, असा इशारीही यावेळी देण्यात आला आहे.

## डाक जीवन विमा योजनेचे प्रीमिअम भरण्यासाठी ऑनलाईन सुविधा

**बुलढाणा/प्रतिनिधी :** भारतीय डाक विभागामार्फत डाक जीवन विमा व ग्रामीण डाक जीवन विमा या योजना नागरिकांना विमासुरक्षा देण्याकरिता चालविल्या जातात. विमा योजनांचे प्रीमिअम भरण्यासाठी विमाधारकांनी ऑनलाईन पध्दतीचा वापर करण्याचे आवाहन डाक अधीक्षक गणेश आंभोरे यांनी केले आहे.

विमाधारकांनी विमा योजनांचे प्रीमिअम भरण्यासाठी श्रिळ. ळपवळर्रीीं.सीं.ळप या लिंकचा किंवा आयपीपीबी पचा उपयोग करावा. याशिवाय एनएसीएच सुविधेचा उपयोग करुन विमाधारकांच्या बँक खात्यामधून आपोआप कपातीची सुविधा वापरावी. तसेच ज्या विमाधारकांच्या पॉलिसीला मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी अद्ययावत नाही अशांनी इंडिया पोस्ट कॉल सेंटरच्या १८०० २६६ ६८६८ या क्रमांकावर किंवा आपल्या जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये संपर्क साधावा, असे आवाहन डाक अधीक्षक यांनी केले आहे.

## जिल्हास्तरीय फुटबॉल युथ लिग स्पर्धा; २८ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** फुटबॉल खेळाची शालेय विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण होण्यासाठी प्रथमच जिल्हास्तरीय युथ फुटबॉल लिग स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील शाळा व फुटबॉल क्लबमधील १६ वर्ष वयोगटातील खेळाडूंनी २८ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस.महानकर यांनी केले आहे.

फुटबॉल या खेळाचा प्रचार व प्रसार समाजातील प्रत्येक खेळाडूंपर्यंत व्हावा यासाठी जिल्हा क्रीडा कार्यालय व जिल्हा फुटबॉल संघटना बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय युथ फुटबॉल लिग सन २०२४-२५ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हातील सर्व शाळेतील १६ वर्ष वयोगटातील खेळाडुंना स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील विविध शाळेतील संघाची नोंदणी जिल्हा क्रीडा कार्यालय बुलढाणा येथे ऑफलाईन विनामूल्य नोंदणी करून संघाची यादी दि. २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत कार्यालयात जमा



करून प्रवेश निश्र्चित करावा. सदर स्पर्धेसाठी खेळाडुंची वयोमर्यादा १ जानेवारी २००९ नंतरचा जन्म झालेला खेळाडु स्पर्धेकरीता पात्र राहील. स्पर्धेची तारीख नंतर कळविण्यात येईल.

फुटबॉल युथ लिग स्पर्धे संदर्भातील अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे किंवा एन.आर.वानखडे (९९६०४३४४८७), डॉ. जे. डब्ल्यु मोहोड(९४०५७३४४०३), मुकेश बाफणा (९४२२८८११०५), एस.एस.केळे(९४२३४४६५१६) यांच्याशी संपर्क साधावा, अशी माहिती जिल्हा क्रीडा कार्यालयाव्दारे कळविण्यात आली आहे.